Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# महिला व बालविकास विभाग

## विभागाबद्दल थोडक्यात

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ९.६८ कोटी इतकी असून त्यापैकी ४८ टक्के (एकूण ४.६४ कोटी) महिला आहेत. तर एकूण लोकसंख्येच्या तुलनेत बालकांचे (० ते १४ वयोगट) प्रमाण ३२ टक्के आहे. १९९४ मध्ये राज्यातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी महिला धोरण तयार करून शासनाने महिला व बाल कल्याण विभागाची स्थापना केली. महिलांच्या विकासासाठी स्वतंत्र धोरण व विभाग स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. विविध विकासात्मक कार्यक्रम राबवून महिलांचा, प्रामुख्याने ग्रामीण महिलांचा सामाजिक तसेच आर्थिक दर्जा सुधारणे हे महिला व बालविकास विभागाचे उद्दिष्ट आहे. महिला धोरण तयार करण्यामध्ये शासनाने जी तत्परता दाखविली ती प्रत्यक्ष धोरणाची अंमलबजावणी करताना मात्र अभावानेच आढळते.

### महिला व बालकल्याण विभागाचे राज्य अर्थसंकल्पातील स्थान

आलेख क्र. १




स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका (निव्वळ रकमा)

- राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ४८ टक्के महिला व ३२ टक्के बालकांच्या विकासाच्या योजना राबविणारा हा विभाग आहे.
- वर्ष २००८-०९ पर्यंत (वर्ष २००७-०८ वगळता) एकाही वर्षी विभागावर अर्थसंकल्पाच्या तुलनेत १ टक्का रक्कमही खर्च झालेली नाही.
- वर्ष २००९-१० व २०१०-११ चे सुधारित व अर्थसंकल्पीय अंदाज खर्चाच्या प्रमाणात वाढ दर्शवित असले तरी हे अंदाज प्रत्यक्षात उतरणे महत्त्वाचे ठरेल.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## राज्य योजनेतील १०० रुपयांपैकी ३ रुपयेही महिला व बालकांसाठी नाहीत

आलेख क्र. २




| | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनेतर | ०.४५ | ०.३५ | ०.४१ | ०.३२ | ०.४४ | ०.४१ | ०.७६ | ०.५७ | ०.७८ | ०.९१ |
| योजनांतर्गत | ४.१४ | ४.१५ | ३.०२ | २.५८ | २.५३ | २.५४ | २.२५ | २.०६ | २.९३ | २.९१ |

स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका (निव्वळ रकमा)

- वर्ष २००२-०३ पर्यंत राज्य योजनेपैकी ४ टक्क्यांहून अधिक रक्कम महिला व बाल विकास विभागावर खर्च होत होती.
- त्यापुढील वर्षात हे प्रमाण सातत्याने कमी होत वर्ष २००८-०९ पर्यंत २.०६ टक्क्यांपर्यंत पोहोचले.
- वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अंदाज, राज्य योजनेतील महिला व बाल विकास विभागावरील खर्चाचे प्रमाण वाढेल असे दर्शवितात.
- राज्याच्या योजनेतर खर्चापैकी मात्र १ रुपयाही महिला व बालविकास विभागावर खर्च होत नाही.

## महिला व बालकल्याण विभागावरील खर्चाचे अंदाज व प्रत्यक्ष खर्च

आलेख क्र. ३




| | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २४८.८ | २७७.७ | ३४३.९ | ३५७.८ | ३४६.८ | ३६१.९ | ४६३.१ | ४६६.३ | १०४३.० | ६७९.८ | १९०९.४ |
| सुधारित अंदाज | १९२.० | २५०.९ | २७९.० | ३५४.२ | ३१५.० | ३८१.७ | ५४३.१ | १०१५.५ | ११०७.१ | १७४३.१ | |
| प्रत्यक्ष | २८९.५ | ४२४.९ | ४१०.० | ४८८.३ | ४५४.१ | ५९६.८ | ६८२.० | ९२२.६ | ९५५.७ | | |

स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका (निव्वळ रकमा)

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## महाराष्ट्राचे महिला धोरण – २००१ : जे कधी राबविले गेलेच नाही

- २००२-०३ पासून प्रत्येक विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात 'महिलांचे सक्षमीकरण' असे प्रकरण असेल. ज्यात संबंधित विभाग महिलांना सक्षम करण्याकरिता कोणती धोरणे, योजना, कार्यक्रम राबविणार आहे, त्याकरिता किती निधी देण्यात येणार आहे, त्याचा महिलांवर काय परिणाम होणार आहे याचा उल्लेख असेल.
- त्याचप्रमाणे 'महिलांचे सक्षमीकरण' या प्रकरणात योजनांच्या अंमलबजावणीत, नियोजनात व अंमलबजावणीत महिलांना कशाप्रकारे सहभागी करून घेतले याचाही उल्लेख असेल.
- यापुढे सामाजिक-आर्थिक दर्जाचे विश्लेषण करताना पुरुष-स्त्री अशी स्वतंत्र विभागणी दर्शविण्यात येईल.
- अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया सुरू असताना महिला संघटनांशी विचारविनिमय करण्यात येईल.
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीमध्ये महिलांच्या घरकामाच्या मूल्याचा समावेश केला जावा अशी शिफारस राज्य शासन केंद्र शासनाला करील.
- सर्व ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सर्व स्तरावरील वार्षिक आणि पंचवार्षिक 'महिला सक्षमीकरण योजना' तयार करतील. विविध स्तरावरील महिला बालविकास समित्यांकडून या योजनांचा आढावा घेण्यात येईल.
- सर्व शासकीय, निमशासकीय विभाग, स्थनिक संस्था, शासनमान्य व शासन सहाय्यित संस्था महिलांना सक्षम करण्यासाठीच्या कृति कार्यक्रमाची सनद तयार करतील. संस्थांना अनुदान, मान्यता किंवा परवानगीच्या अटी व शर्तीत या सनदेचा व तिच्या अंमलबजावणीचा अंतर्भाव करण्यात येईल.
- आदिवासी उपयोजना व विशेष घटक योजनेच्या धर्तीवर 'महिला घटक योजना' तयार करण्यात येईल. महिला घटक योजनेत महिला विकासासाठी घेण्यात येणारे विविध कार्यक्रम व निरनिराळ्या स्त्रोतातून उपलब्ध असणारा निधी दर्शविण्यात येईल.
- स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच सहकारी संस्था, मार्केट यार्डस्, शैक्षणिक संस्था यांना महिला व बालकल्याणासाठी निधी राखून ठेवावा लागेल.
- विविध विभाग व संस्था यांनी महिलांच्या सक्षमीकरणाकरिता राबवायच्या योजना व कार्यक्रमात महिला सनद आणि त्याच्या जबाबदाऱ्या याबाबतीत झालेल्या कार्यवाहीचे नियमितपणे मूल्यमापन केले जाईल.
- पोलीस पाटलांपासून सर्व अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व १/३ पर्यंत वाढविण्यासाठी धोरण आखले जाईल. महिलांना संसदेत व राज्य विधिमंडळात ३० टक्के आरक्षण मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

- विविध क्षेत्रात महिलांच्या स्वयं सहाय्यता गटांची स्थापना तसेच त्यांची कार्यक्षमता, कौशल्य वाढविण्याच्या कार्यक्रमाला प्राधान्य दिले जाईल. स्वयं सहाय्यता गटांना मदत करण्यासाठी महिला कोष स्थापन करण्यात येईल. महिलांच्या आर्थिक विकासाची प्रमुख यंत्रणा म्हणून 'माविम'चे बळकटीकरण करण्यात येईल.

- शेती संलग्न व्यवसायांशी संबंधित सहकारी संस्था सुरू करण्यासाठी महिलांना उत्तेजन दिले जाईल. आवश्यकता भासल्यास जमीनविषयक कायद्यात योग्य ती सुधारणा करून कंत्राटी पद्धतीने शेती करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

- शाळांमधून मुलींची पटसंख्या वाढविण्याकरिता व मुलींची गळती थांबविण्याकरिता सर्वंकष कार्यक्रम घेतला जाईल. मुलींना व्यवसाय शिक्षण देण्यासाठी उपाय योजण्यात येतील. ज्या शाळा मुलींसाठी स्वच्छतागृहांची सुविधा पुरविणार नाहीत त्यांना अनुदान देण्यात येणार नाही.

- सार्वजनिक प्रसाधनगृहांचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रसाधनगृह बांधण्यासाठीचे निकष ठरविले जातील, स्थानिक स्वराज्य संस्था व अन्य संस्थांना येत्या तीन वर्षात महिलांसाठी प्रसाधनगृहे बांधणे कायद्याने बंधनकारक केले जाईल.

- पाणीपुरवठा योजनांच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणी भरण्याचे कष्टाचे व वेळखाऊ काम वर्षानुवर्षे महिलांना करावे लागत आहे. यासाठी ग्रामीण समित्यांवर ५० टक्के महिलांना प्रतिनिधित्व दिले जाईल. पंपांच्या व कूपनलिकांच्या देखभालीची जबाबदारी महिला गटांना दिली जाईल.

- सार्वजनिक ठिकाणे, बाजार, व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रे या ठिकाणी पाळणाघरांचे निकष ठरविले जातील व ही सुविधा तीन वर्षात उपलब्ध करून देणे बंधनकारक केले जाईल. गावपातळीवर पाळणाघरांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष कार्यक्रम तयार केला जाईल.

- बालविवाह रोखण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेतला जाईल.

- महिलांच्या लैंगिक शोषणाला प्रतिबंध करण्यासाठी व त्यांच्या अधिक संरक्षणासाठी विविध स्तरांवर विविध उपाययोजना अवलंबण्यात येतील. उदा: महाविद्यालयात स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्रे, महिला आयोगाचे बळकटीकरण, महिला कैद्यांच्या समस्यांवर कार्यवाही.

- विद्यार्थिनी, नोकरदार महिला व इतर गरजू महिलांसाठी वसतिगृह व स्वतंत्र शासकीय अतिथीगृहांची व्यवस्था करण्यात येईल.

- सुरक्षितता देण्याच्या दृष्टीने महिलांना मालमत्तेचा हक्क प्रस्थापित करणारे विधेयक मांडण्यात येईल.

- मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महिला सक्षमीकरण समिती स्थापन करण्यात येईल. या समितीची बैठक दर तीन महिन्यांनी होईल. तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य पातळीवर कृतिगट, स्थापन करण्यात येतील तसेच जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सक्षमीकरण समित्या स्थापन करण्यात येतील व यांच्या बैठका दरमहा होतील.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# महिला घटक योजनेचा फक्त बोभाटाच झाला . . . . . .

''आदिवासींसाठी आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जातींसाठी असलेली विशेष घटक योजना यांच्या धर्तीवर 'महिला घटक योजना' तयार करण्यात येईल. यामुळे महिलांच्या कार्यक्रमाकरिता पुरेसा निधी मिळू शकेल. निरनिराळ्या योजनांची विसंगती व पुनरावृत्ती टाळून उपलब्ध निधीतून एकत्रितपणे महिला कार्यक्रम राबविण्यात येतील. या महिला घटक योजनेत महिला विकासासाठी घेण्यात येणारे विविध कार्यक्रम आणि निरनिराळ्या स्त्रोतातून उपलब्ध होणारा निधी दर्शविण्यात येईल.'' - महिला धोरण, २००१

महिला धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य असल्याचा उल्लेख मोठ्या अभिमानाने करणाऱ्या महाराष्ट्र शासनाचे मान. महिला व बालविकास मंत्री मात्र या धोरणाशी अनभिज्ञ असावेत असे वाटते.

प्रश्नः राज्यातील महिलांना केंद्रस्थानी मानून त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शासनामार्फत सन २००३-०४ पासून महिला घटक योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय?

उत्तरः नाही.

प्रश्नः असल्यास या योजनेमागचा हेतू व उद्देश काय आहे?

उत्तरः प्रश्न उद्भवत नाही.

प्रश्नः सन २००३-०४ नंतर शासनाने महिला घटक योजनेवरील पुस्तिका प्रकाशित केली नाही हे खरे आहे काय?

उत्तरः होय

प्रश्नः असल्यास त्याची कारणे काय आहेत? २००४-०५ पासून २००६-०७ पर्यंत घटक योजनेंतर्गत विविध योजनांकरिता विभागवार केलेल्या तरतुदी व प्रत्यक्ष खर्च याचा तपशील काय आहे?

उत्तरः सन २००३-०४ मध्ये शासनाच्या विविध विभागामार्फत पूर्णतः महिलांसाठी व अंशतः महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवरील तरतूद दर्शविणारी पुस्तिका प्रकाशित करण्यात आली होती. महिला विशेष घटक योजना तयार करावयाची असल्यास त्याकरिता सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्या धर्तीवर वेगळ्याने नियतव्यय विभागास उपलब्ध करून देणे आवश्यक राहील व यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. इतर विभागांनी महिलांसाठी तरतूद दर्शविणारी माहिती देण्यात आलेली आहे यास्तव सन २००३-०४ नंतर महिला घटक योजनेची तरतूद दर्शविणारी पुस्तिका प्रकाशित केलेली नाही

प्रश्नः तरतुदीपेक्षा खर्च कमी झाला असल्यास त्याची कारणे काय आहेत?

उत्तरः प्रश्न उद्भवत नाही.

उत्तरासोबत मान. मंत्री महोदयांनी त्यांच्या विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या तरतुदींचा व खर्चाचा तपशील जोडला आहे. याशिवाय उच्च व तंत्र शिक्षण विभाग (योजनांचा उल्लेख नाही केवळ तरतूद व खर्च) व ग्राम विकास विभाग (इंदिरा आवास योजनेवरील व स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेवरील खर्च) या दोन विभागांनी महिलांसाठी (?) राबविण्यात येणाऱ्या योजनांवरील खर्चाची दिलेली माहिती जोडली आहे.

संदर्भः विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ६३४५८, दिनांक ३ ऑक्टोबर २००७

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## विधिमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीने केलेल्या काही महत्त्वाच्या शिफारशी

- राज्यातील प्रत्येक महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित वाढणार असल्यामुळे महिलांकरिता स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याबाबत शासनाने त्वरित निर्णय घ्यावा.
- महानगरपालिका क्षेत्रातील पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे व मुख्य शहर अशा ३ ठिकाणी महिलांच्या कल्याणकारी योजनांची माहिती देणारी 'एक खिडकी योजना' त्वरित सुरू करावी.
- महापालिकेच्या मालकीच्या मार्केटस् व मंडया यामधील गाळ्यांमध्ये महिलांसाठी ३० टक्के गाळे आरक्षित ठेवावेत.
- शासनाने विधिमंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीला अपेक्षित माहिती वेळेवर पुरवण्याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना द्याव्यात.
- महिलांचे सक्षमीकरण व बलशालीकरण करण्याकरिता जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांपैकी ज्या योजना कालबाह्य झालेल्या आहेत त्याचा आढावा घेऊन कालानुरुप नवीन योजनांचा समावेश करण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी.
- मुलींचे शाळेतील प्रमाण वाढावे यासाठी त्यांना देण्यात येणारा उपस्थिती भत्ता हा मुलीच्या आईकडे देण्याबाबत शासनाने आदेश काढावेत.
- फौजदारी प्रक्रिया संहितेमधील तरतुदीनुसार किरकोळ गुन्ह्यांमध्ये कैद असलेल्या महिला बंदींना जामीन मंजूर करून त्यांना कारागृहातून लवकर सोडण्याची व्यवस्था करण्यात यावी. ज्या महिला बंदींना जामीन देण्यास कोणी पुढे येत नाही त्यांना अन्य मार्गाने किंवा वैयक्तिक बॉंडस् वर जामीन देता येईल काय याबाबत विचार करावा.
- राज्यातील कारागृहात Video conferencing ची पद्धत त्वरित सुरू करावी.
- राज्यातील महिला कैद्यांच्या ४ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या मुलांना रिमांड होममध्ये न ठेवता त्यांच्यासाठी वसतिगृहाच्या धर्तीवर वेगळी व्यवस्था करण्यात यावी. तसेच कारागृहात जर महिला बंदी स्तनदा माता असतील तर अशा कैद्यांच्या संदर्भात त्वरित जामीन मिळण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करावे.
- सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतवणुकीस प्रतिबंध करण्याकरिता ठरवून दिलेल्या १२ मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने त्वरित परिपूर्ण कार्यवाही करावी.
- शासनाने शासकीय कार्यालयांमध्ये महिलांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करावेत.
- राज्य शासनाने महिलांच्या लैंगिक सतवणुकीबाबत स्वतंत्र कायदा तयार करावा.
- महिलांच्या लैंगिक शोषणासंदर्भात करण्यात येणारी चौकशी गुप्त स्वरुपाची (इन कॅमेरा) असावी.
- महिला कारागृहातील महिला बंदींची संख्या लक्षात घेऊन त्या ठिकाणी आवश्यक असलेल्या महिला वैद्यकीय अधिकारी, महिला तुरुंग अधिकारी, महिला शिपाई, नर्सेस ही पदे त्वरित भरण्याबाबत कारवाई करावी.

| |
|---|
| meecelleevee keÀueu³ee eMeHeÀejMee®³ee Òel³e#e DeceueyepeeJeCee®e GÊejoee³elJe ÒeMeemeveeve Heej Hee[eJe ³eemeeþe ceeve. meom³e Deeûene jenleeue DeMee DeHe#ee Deen. |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# पुरोगामी राज्यातील महिला कल्याणाच्या कालबाह्य योजनांची दूरावस्था

## जिजामाता महिला आधार विमा योजना

या योजनेंतर्गत कुटुंब प्रमुखाचे अपघाती निधन झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा मुली/मुलास रु. २५,००० एवढे एकरकमी अर्थसहाय्य राष्ट्रीय विमा कंपनीकडून देण्यात येते. कायमस्वरूपी अपंगत्व आल्यासही अर्थसहाय्य दिले जाते. सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत पिवळे/भगवे रेशनकार्ड देण्यात आलेल्या १ कोटी ६० लाख कुटुंबाना शासनाने राष्ट्रीय विमा कंपनीबरोबर वाटाघाटी करून विम्याचे संरक्षण दिले होते. वार्षिक विमा हप्ता प्रति कुटुंब १ रुपया ७५ पैसे एवढा होता. त्याप्रमाणे २ कोटी ८० लाख एवढी रक्कम कंपनीला मे, १९९९ मध्ये प्रदान करण्यात आली. प्रत्येक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये वार्षिक हप्त्याची रक्कम प्रतिबिंबीत होणे अपेक्षित असताना २००१-०२ पासून योजनेवर १ रुपयाही खर्च झाल्याचे दिसत नाही.

तक्ता क्र: १ — रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | १००.०० | २०.०० | ०.००(०) |
| २००२-०३ | ७८.५० | ३३.०० | ०.००(०) |
| २००३-०४ | १५२५.०० | ४५२.८४ | ०.००(०) |
| २००४-०५ | १.०० | ०.०० | ०.००(०) |
| २००५-०६ | १.०० | १.०० | ०.००(०) |
| २००६-०७ | १.०० | १.०० | ०.००(०) |
| २००७-०८ | १.०० | १.०० | ०.००(०) |
| २००८-०९ | ५५०.०० | ५५०.०० | ०.००(०) |
| २००९-१० | १८३.३३ | १८३.३३ | |
| २०१०-११ | ०.०० | | |

## कामधेनु योजना

या योजनेंतर्गत नोंदणीकृत महिला संस्थांना पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, शासकीय कार्यालये, शासकीय संस्था, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, महामंडळे इत्यादींना लागणारे गणवेश, चादरी, उशांचे अभ्रे, रोग्यांचे कपडे, डस्टर, झाडू, खाद्यपदार्थ इत्यादींच्या पुरवठ्याचे ५० टक्के पर्यंतचे काम देण्यात येते.

तक्ता क्र: २ — रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | २२.९४ | १५.०० | ०.००(०) |
| २००२-०३ | ५.०० | ०.५० | ०.००(०) |
| २००३-०४ | १.६६ | ०.६६ | ०.००(०) |
| २००४-०५ | ०.५४ | ०.०० | ०.००(०) |
| २००५-०६ | ०.३२ | ०.३२ | ०.००(०) |
| २००६-०७ | ०.५० | ०.५० | ०.२३(४६) |
| २००७-०८ | १.०० | १.०० | ०.५५(५५) |
| २००८-०९ | १.०० | १.०० | ०.५२(५२) |
| २००९-१० | ०.३३ | ०.८० | |
| २०१०-११ | ०.०० | | |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार

महिला व बालविकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या समाजसेविकांच्या व संस्थांच्या कामाची दखल घ्यावी व इतर समाजसेविका, संस्थांना त्यापासून प्रेरणा मिळावी या उद्दिष्टाने उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या समाजसेविका व संस्थांना हा पुरस्कार देण्यात येतो. दरवर्षी राज्यस्तरावर एका महिलेस एक लाखाची रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देण्यात येते. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील एका महिला समाजसेविकेसरु. १०,००१ एवढ्या रकमेचा पुरस्कार दिला जातो व राज्यातील ६ स्वयंसेवी संस्थांनाही प्रत्येकी रु. २५,००१ एवढ्या रकमेचा पुरस्कार देण्यात येतो.

तक्ता क्र: ३ रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ८.५० | ५.०० | ०.०० (०) |
| २००२-०३ | ८.५० | ८.५० | २२.०० (२५९) |
| २००३-०४ | ८.५० | ८.५० | ०.०० (०) |
| २००४-०५ | ८.५० | २८.०० | २८.०० (३२९) |
| २००५-०६ | ८.५० | ८.५० | १.०० (११.७) |
| २००६-०७ | ८.५० | ८.५० | ०.०० (०) |
| २००७-०८ | ८.५० | ८.५० | ०.०० (०) |
| २००८-०९ | ८.५० | ८.५० | ०.००(०) |
| २००९-१० | ८.५० | ८.५० | |
| २०१०-११ | १००.०० | | |

**पुरस्कारालायक महिला व संस्था महाराष्ट्रात नसल्याचा शासनाचा दावा तर नाही ना?**

## निराधार व विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान

निराधार, विधवा निराश्रित महिलेच्या मुलीच्या विवाहासाठी काही अटी व शर्तींच्या अधिन राहून रु. २ हजार इतके अनुदान या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात येते. अर्थसहाय्य दिल्यामुळे त्यांच्या भावी आयुष्याची सुरुवात चांगली होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

तक्ता क्र: ४ रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | २०.०० | १६.०० | १.८८ (९.४) |
| २००२-०३ | २०.०० | १०.०० | ११.४२ (५७.१) |
| २००३-०४ | २०.०० | २०.०० | ३.८४ (१९.२) |
| २००४-०५ | २०.०० | २०.०० | ३.७८ (१८.९) |
| २००५-०६ | १५.०० | ५.०० | १७.५४ (११६.९) |
| २००६-०७ | १५.०० | १५.०० | ११.४८ (७६.५३) |
| २००७-०८ | १५.०० | १३.६० | १०.६०(७०.६) |
| २००८-०९ | १५.०० | १५.०० | १३.६६ (९१.०७) |
| २००९-१० | १५.०० | १५.०० | |
| २०१०-११ | १५.०० | | |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## हुंडा पद्धतीचे निर्मूलन

हुंडा प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी प्रभावीरित्या होण्यासाठी व हुंडा पद्धतीचे निर्मूलन होण्यासाठी या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली, शासकीय आणि अशासकीय सदस्यांचा अंतर्भाव असलेली समिती गठित करण्यात आली आहे. हुंड्याच्या अनिष्ट रुढीचे उच्चाटन करण्यासाठी, कायद्याबरोबर सामाजिक प्रयत्नांची जोड देण्याचा प्रयत्न केला जातो. जनजागरण, प्रचार व प्रसिद्धी याबरोबरच महिलांना कायदेशीर सहाय्य मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो.

तक्ता क्र: ५ रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ६.८४ | ३.०० | ०.९४ (१३.७) |
| २००२-०३ | ४.०० | १.०० | १.५३ (३८.२) |
| २००३-०४ | १.९८ | ०.९८ | १.९७ (९९.५) |
| २००४-०५ | १.४० | १.४० | १.३६ (९७.१) |
| २००५-०६ | ६.७० | ६.७० | २.७२ (४०.६) |
| २००६-०७ | २.६७ | २.९० | २.५९ (९७) |
| २००७-०८ | ४.६० | २९.६० | ०(०) |
| २००८-०९ | ४८७.०३ | ०.०० | ८६.३९(१७.७४) |
| २००९-१० | ०.०० | ४३७.३५ | |
| २०१०-११ | २.८० | | |

## सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र

या योजनेंतर्गत महिलांना कायदेविषयक सल्ला देण्यासाठी, व्यवसाय व नोकरी निवडीबाबत सल्ला देण्यासाठी, आपदग्रस्तांना तात्पुरता आश्रय देण्यासाठी, व्यावसायिक प्रशिक्षणासाठी, वाचनालयाची सुविधा उपलब्ध करण्यासाठी, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालविण्यासाठी, पाळणाघर चालविण्यासाठी, प्रौढ साक्षरता वर्ग चालविण्यासाठी, शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन देण्यासाठी केंद्र निर्माण करता येते. या केंद्रास रु. १ लाख ३७ हजार ६०० इतके वार्षिक आवर्ती अनुदान व रु. २ लाख ७४ हजार ५०० इतके अनावर्ती अनुदान प्रत्यक्ष खर्चाच्या अधिन राहून अनुज्ञेय आहे.

तक्ता क्र: ६ रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ८८.१५ | ४५.०० | २१.८० (२४.७) |
| २००२-०३ | १९.५० | १५.०० | १२.८३ (६५.८) |
| २००३-०४ | १६.३५ | १६.३५ | १४.९४ (९१.३) |
| २००४-०५ | ३९.८३ | १८.५० | २५.९४ (६५.१) |
| २००५-०६ | ४९.०० | ४९.०० | १९.८९ (४०.६) |
| २००६-०७ | ५०.०० | ५०.०० | १४.८४ (२९.७) |
| २००७-०८ | ५०.१० | ५०.१० | १३.९२(२७.७) |
| २००८-०९ | २५.०० | २५.०० | १६.२५(६५) |
| २००९-१० | ८.३३ | २८.०० | |
| २०१०-११ | ०.०१ | | |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

### व्यवसाय प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन

आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय कुटुंबातील मुलींना संगणक, नर्सिंग पंचिग, टेलिफोन ऑपरेटर, आय.टी.आय.मध्ये व्यवसाय प्रशिक्षण घेत असलेल्या मुलींना प्रशिक्षणाच्या कालावधीत दरमहा रु. १०० इतके विद्यावेतन देण्यात येते. मुलींना प्रशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देणे व स्वयंरोजगार सुरू करण्यासही याद्वारे प्रवृत्त करण्यात येते.

तक्ता क्र: ७ रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ७०.०० | ५०.०० | २१.९९ (३१.४) |
| २००२-०३ | ६०.०० | २०.०० | १०.४८ (१७.४) |
| २००३-०४ | ८४.०४ | ५.०० | २७.०७ (३२.२) |
| २००४-०५ | ३४.३४ | ३२.१५ | २८२.४३ (८२२.४) |
| २००५-०६ | ४१.०६ | ४१.०६ | ९१.२२ (२२२.१) |
| २००६-०७ | २७.७६ | ३७.१४ | ३७.३५ (१३४.५) |
| २००७-०८ | ४१.३० | ४१.३० | ३९.४०(९५.४) |
| २००८-०९ | २८.६३ | २८.६३ | १९.५५(६८.२९) |
| २००९-१० | ९.५४ | १७.६४ | |
| २०१०-११ | ०.०० | | |

### स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना वैयक्तिक व्यावसायिक आर्थिक सहाय्य

आर्थिकदृट्या दुर्बल घटकांतील महिलांना खाद्यपदार्थ तयार करून विकणे, मण्यांच्या वस्तू करून विकणे, भाजीपाला व फळे विकणे इ. व्यवसायाकरिता मदत म्हणून रु. ५०० इतके अनुदान या योनजेद्वारे देण्यात येते. महिलांनी स्वावलंबी बनावे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. हे अनुदान निराधार, परित्यक्ता, विधवा अथवा नैतिक संकटात सापडलेल्या महिलांनाही अनुज्ञेय आहे.

तक्ता क्र: ८ रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | ६५.०० | ४८.०० | १८.४८ (२८.४) |
| २००२-०३ | ५०.०० | २०.०० | ७.७८ (१५.५) |
| २००३-०४ | ३६.५६ | ६.०० | १४.५० (३९.६) |
| २००४-०५ | ३२.३७ | ३२.३७ | १७.५६ (५४.२) |
| २००५-०६ | ४९.२७ | ४९.२७ | ४८.६३ (९८.७) |
| २००६-०७ | ३२.८९ | ४२.६० | ४१.३७ (१२५.८) |
| २००७-०८ | ३२.५६ | ३२.५६ | ३९.८२(१२२.३) |
| २००८-०९ | २०.०० | २०.०० | १३.००(६५) |
| २००९-१० | ६.६७ | ५.३४ | |
| २०१०-११ | ०.०० | | |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## देवदासी निर्वाह अनुदान

देवदासी निर्वाह अनुदान योजनेंतर्गत ४० वर्षांवरील देवदासींना दरमहा रु. ३०० प्रमाणे निर्वाह अनुदान अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येते.

तक्ता क्र: ९ रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | १२८.०० | १०२.४० | ६७.७२ (५२.९) |
| २००२-०३ | ११५.३९ | १६६.३६ | १४९.९९ (१३०) |
| २००३-०४ | ११५.३९ | ११५.३९ | १२५.६० (१०८.९) |
| २००४-०५ | १२०.०० | १२५.०० | १०१.७९ (८४.८) |
| २००५-०६ | १२५.०० | १२५.०० | ८९.१० (७१.३) |
| २००६-०७ | १३०.०० | २२४.८१ | २१९.४४ (१६८.८) |
| २००७-०८ | १६०.०० | २४६.६७ | २१६.२३ (१३५.१) |
| २००८-०९ | २२०.०० | २२०.०० | २१८.४१ (९९.२८) |
| २००९-१० | २२५.०० | २२५.०० | |
| २०१०-११ | २२५.०० | | |

## देवदासी पुनर्वसन योजना

देवदासी किंवा तिच्या मुलीच्या विवाहासाठी रु. १०,००० इतके विवाह अनुदान या योजनेंतर्गत देण्यात येते. अनुदानापैकी रु. २,००० पर्यंतची रक्कम विवाह सोहळ्याच्या खर्चाकरिता तर रु. ८,००० पर्यंतची रक्कम नवदांपत्यांच्या संयुक्त खात्यात राष्ट्रीयकृत बँकेत जमा करण्यात येते.

तक्ता क्र: १० रु. लाखात

| वर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च (%) |
|---|---|---|---|
| २००१-०२ | २२.५६ | १५.३२ | १०.४३ (४६.२) |
| २००२-०३ | १५.६२ | ७.४६ | ९.२८ (५९.४) |
| २००३-०४ | २१.०२ | ८.१२ | १२.६१ (६०) |
| २००४-०५ | १६.५४ | ११.०६ | १५.७६ (९५.३) |
| २००५-०६ | १२.३१ | १५.६२ | १३.८६ (११२.६) |
| २००६-०७ | १६.२१ | १६.२१ | ११.७७ (७२.६) |
| २००७-०८ | १६.६२ | १६.६२ | १५.४२(९२.७) |
| २००८-०९ | १८.५० | १८.५० | १४.७९ (७९.९५) |
| २००९-१० | १६.६७ | २३.०० | |
| २०१०-११ | १५.०० | | |

योजनांसंदर्भातील सर्व माहितीचा स्त्रोत अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## महिलांवरील अत्याचाराचे वाढते गुन्हे

| अ.क्र. | गुन्हे | वर्ष २००६ | वर्ष २००७ | वर्ष २००८ | मागील वर्षाच्या तुलनेत झालेली वाढ (%) |
|---|---|---|---|---|---|
| १. | हुंड्यासाठी खून | १६८ | १९२ | १७५ | -८.८५ |
| २. | हुंड्यासाठी खुनाचा प्रयत्न | ९८ | १३५ | १४० | ३.७० |
| ३. | हुंडाबळी | ३८७ | ४३६ | ३९० | –१०.५६ |
| ४. | पळवून नेणे व अपहरण | ९२१ | ९६७ | ९९८ | ३.२१ |
| ५. | पतीच्या नातेवाईकांकडून छळ | ६,७३८ | ७,३५६ | ७,८२९ | ६.४३ |
| ६. | विनयभंग | ३,४७९ | ३,३०६ | ३,६१९ | ९.४७ |
| ७. | लैंगिक छळ | ९८४ | १,०३९ | १,०९१ | ५.०० |
| ८. | अनैतिक व्यापार | ३७८ | ३२२ | ३२७ | १.५५ |
| ९. | हुंडा प्रतिबंधक | ५५ | ४५ | ४९ | ८.८९ |
| १०. | बलात्कार | १,५०० | १,४५१ | १,५५८ | ७.३७ |
| | एकूण | १४,७०८ | १५,२४९ | १६,१७६ | ६.०७ |

राज्यातील महिलांवरील एकूण अत्याचारांपैकी सर्वाधिक गुन्हे मुंबई (९.३टक्के), अहमदनगर (५टक्के), ठाणे शहर (४.४ टक्के), पुणे व जळगाव (४.२ टक्के)या जिल्ह्यांमध्ये होतात.

## बालकांवरील अत्याचाराचे वाढते गुन्हे

| अक्र. | गुन्हे | वर्ष २००६ | वर्ष २००७ | वर्ष २००८ | मागील वर्षाच्या तुलनेत झालेली वाढ (%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बालकांचे खून | २०७ | २१३ | १७८ | -१६.४३ |
| २ | बालकांवरील बलात्कार | ६५५ | ६१५ | ६९० | १२.२० |
| ३ | बालकांना पळवून नेणे | ५५२ | ५९० | ५९८ | १.३६ |
| ४ | मुलींचा ताबा मिळविणे | १५ | १३ | १३ | ०.०० |
| ५ | वेश्या व्यवसायाकरीता मुली विकत घेणे | २३ | ३१ | २५ | १९.३५ |
| ६ | भ्रुण हत्या | १० | १ | ०२ | १०० |
| ७ | इतर गुन्हे | ११०१ | ९३२ | ९२० | -१.२९ |
| | एकूण | २५६३ | २३९५ | २४२६ | १.२९ |

## बालिकांवरील बलात्काराचे वाढते प्रमाण

| वर्ष | १० वर्षांखालील | १०-१४ वर्षे | १४-१८ वर्षे | १८-३० वर्षे | ३०-५० वर्षे | ५० वर्षांवरील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००७ | ९९ | १२५ | ३९३ | ६५९ | १६८ | १३ | १४५७ |
| २००८ | ११८ | १३५ | ४४१ | ७०७ | १६१ | ५ | १५६७ |
| वाढ | १९.१९ | ८.०० | १२.२१ | ७.२८ | -४.१७ | –६१.५ | ७.५५ |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# ‘छकुल्या मुकलेल्या’

## महाराष्ट्र राज्य, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचा अहवाल

### १००० पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण दर्शविणारे जिल्हानिहाय विवरणपत्र

| अक्र. | जिल्हा | सन १९९१ | सन २००१ | अक्र. | जिल्हा | सन १९९१ | सन २००१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | ९४२ | ९२२ | १९ | बीड | ९३९ | ८९४ |
| २ | मुंबई उपनगर | ९३० | ९२३ | २० | परभणी | ९५६ | ९२३ |
| ३ | ठाणे | ९५२ | ९३१ | २१ | हिंगोली | ९५३ | ९२७ |
| ४ | रायगड | ९६१ | ९३९ | २२ | लातूर | ९४७ | ९१८ |
| ५ | रत्नागिरी | ९६१ | ९५२ | २३ | उस्मानाबाद | ९४७ | ८९४ |
| ६ | नाशिक | ९५४ | ९२० | २४ | नांदेड | ९६० | ९२९ |
| ७ | धुळे | ९४७ | ९०७ | २५ | अकोला | ९२९ | ९३३ |
| ८ | नंदुरबार | ९७७ | ९६१ | २६ | वाशिम | ९४१ | ९१८ |
| ९ | अहमदनगर | ९४९ | ८८४ | २७ | अमरावती | ९५० | ९४१ |
| १० | जळगाव | ९२५ | ८८० | २८ | बुलढाणा | ९४५ | ९०८ |
| ११ | पुणे | ९४३ | ९०२ | २९ | यवतमाळ | ९६१ | ९३३ |
| १२ | सातारा | ९४१ | ८७८ | ३० | नागपूर | ९५१ | ९४२ |
| १३ | सोलापूर | ९३५ | ८९५ | ३१ | वर्धा | ९५२ | ९२८ |
| १४ | कोल्हापूर | ९३१ | ८३९ | ३२ | चंद्रपूर | ९६५ | ९३९ |
| १५ | सांगली | ९२४ | ८५१ | ३३ | भंडारा | ९६४ | ९५६ |
| १६ | सिंधुदुर्ग | ९६३ | ९४४ | ३४ | गोंदिया | ९७८ | ९५८ |
| १७ | औरंगाबाद | ९३३ | ८९० | ३५ | गडचिरोली | ९८० | ९६६ |
| १८ | जालना | ९५१ | ९०३ | | **महाराष्ट्र राज्य** | **९४६** | **९२६** |

## १० वर्षात खालावलेली परिस्थिती

| १९९१ | २००१ |
|---|---|
| राज्यातील अठरा जिल्ह्यांमध्ये मुलींचे प्रमाण ९५० पेक्षा अधिक | राज्यातील फक्त पाचच जिल्ह्यांमध्ये स्त्री-पुरुष प्रमाण ९५० पेक्षा अधिक |
| राज्यातील एकाही जिल्ह्यात मुलींचे प्रमाण ९०० पेक्षा कमी नाही | राज्यातील आठ जिल्ह्यांमध्ये मुलींचे प्रमाण ९०० पेक्षा कमी |
| कोल्हापूर जिल्ह्यातील मुलींचे प्रमाण ९३१ | कोल्हापूरमधील मुलींचे प्रमाण ८३९ एवढे कमी (राज्यातील सर्वात कमी प्रमाण)<br>जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यात ७९५ एवढे लाजिरवाणे प्रमाण |

**२०११ पर्यंत राज्यातील स्त्री-पुरुष प्रमाण ९१५ एवढे कमी होईल.**

-महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००९-१०

राज्याचा माता मृत्यु दर: १३५

राज्यातील बाल विवाहांचे प्रमाण: ५५ टक्के

राज्यातील ॲनिमिक आदिवासी महिला: ६४.२

- राज्य नियोजन मंडळ